संपादकीय

# आशियाई पायाभूत विकास गुंतवणूक बँकेच्या प्रतिरोधासाठी जन परिषद

आज देशात लोकशाहीवादी आणि समतावादी आवाजांना जेव्हा क्षणोक्षणी कठीण संकटाची जाणीव होते आहे अशा वेळी पायाभूत सुविधांसाठी करण्यात येणारा वित्तपुरवठा या विषयावर आयोजित करण्यात आलेली जन परिषद ही अत्यंत प्रेरणादायी आणि पुढे येणाऱ्या आव्हानात्मक परिस्थितीला तोंड देण्यासाठी ऊर्जा देणारी ठरली.

'विकास हवा! विनाश नको!' या घोषणेचा जन्म झाला त्या ऐतिहासिक अशा हरसूद रॅली नंतर २९ वर्षांनी या जन परिषदेच्या निमित्ताने परत एकदा तशाच सर्जनशील ऊर्जेचा अनुभव आला आणि अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्यासाठी सर्वांना हुरूपही आला. २१ ते २३ जून दरम्यान घेण्यात आलेल्या या जन परिषदेवर नुकत्याच थूथुकुडी येथे घडलेल्या भयानक आणि दु:खदायक घटनेचे सावट होते. बंदूकधारी पोलिसांनी नेम धरून आंदोलनकारी सामान्य जनतेवर केलेला गोळीबार हा क्रूरतेचा कळस होता. स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त हवा या मूलभूत हक्कासाठी लढणाऱ्या नागरिकांचे आंदोलन कसे निष्ठूरपणे चिरडता येऊ शकते याचे उदाहरण घालून दिले गेले. थूथुकुडी येथे घडलेल्या या शोकांतिकेचे खोल पडसाद परिषदेमध्ये उमटले कारण या प्रकरणाने एक गंभीर विरोधाभास ठळकपणे समोर आला. तो असा की गेल्या २० वर्षांपासून जगभरातील कार्यकर्त्यांच्या अथक संघर्षांनंतर बऱ्याच आंतराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी औद्योगिक कंपन्या आणि सामान्य जनता यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी अनेक नवीन पर्यावरणीय आणि सामाजिक मापदंड निश्चित केले. काही देशांनी आणि कंपन्यांनी हे मापदंड अमलातही आणले. तरीही, अजूनही टाळता येण्यासारख्या अनेक त्रासदायक गोष्टी औद्योगिक आणि पायाभूत प्रकल्पामधून गरीब जनतेवर आणि पर्यावरणावर लादल्या जात आहेत. हे असे का होत आहे आणि जन आंदोलनांनी अशा परिस्थितीला कसे सामोरे जायचे हा महत्वाचा प्रश्न आहे.

गेल्या २० वर्षांपासून थूथकुडी येथे असलेल्या 'स्टरलाईट कॉपर' या कंपनीतून होणाऱ्या प्रदूषणाविरोधात स्थानिक जनता आंदोलन करत आहे. 'स्टरलाईट कॉपर' ही कंपनी 'वेदांता लिमिटेड'च्या मालकीची आहे, जी इंग्लंडमधील 'वेदांता रिसोर्सेस'ची सिस्टर कंपनी आहे. या कंपनीचीच आपल्या देशात ओरिसा येथे बॉक्साइटची खाण आहे. तिथेही स्थानिक 'कोंढ' आदिवासी या कंपनीविरुद्ध गेल्या १० वर्षांपासून आंदोलन करीत आहेत. यामुळे कंपनीच्या अनेक गुंतवणूकदारांनी आणि विविध जागतिक सेवाभावी संस्थांनी या कंपनीवर दबाव आणला आहे. सध्या चालू असलेल्या 'नैतिक गुंतवणूक कला'नुसार २०१० मध्ये या कंपनीचे एक गुंतवणूकदार 'चर्च ऑफ इंग्लंड' यांनी आपले कंपनीतील भाग भांडवल विकून टाकले. नैतिक गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार अशाच कंपन्यांत पैसे गुंतवतात ज्यांच्या कारभारामुळे स्थानिक जनतेला किंवा पर्यावरणाला हानी पोहचत नाही. या संपूर्ण संघर्षात, आपली कंपनी पर्यावरणाला आणि सामाजिक न्यायाला बांधील आहे, असे वेदांताचे अधिकारी आवर्जून सांगत आहेत. पण सत्य परिस्थिती याच्या उलट आहे. ओरिसामध्ये आणि थूथुकुडीमधेही!

जन आंदोलने यासारख्या प्रकरणाला दोन प्रकारे प्रतिसाद देऊ शकतात. एक म्हणजे ज्या प्रकारे भांडवलशाही पूर्ण शक्तीनिशी एकवटून केंद्रीत होते याचा संपूर्णपणे निषेध करणे. या परिषदेच्या ठरावात म्हटल्याप्रमाणे,' हा प्रकार म्हणजे नफेखोरी, उन्मत्त भांडवलशाही आणि क्रोनी भांडवलशाही याचा परिपाक आहे.' दुसरं म्हणजे जगभरातील जन आंदोलनांच्या नेटवर्कमार्फत कंपनीवर सतत बाहेरून दबाव आणायचा आणि त्याच वेळी नैतिक गुंतवणूकदारांतर्फे आतून बदल घडवून आणण्याचा चिकाटीने प्रयत्न करायचा.

मुंबईत झालेल्या या जनपरिषदेत या दोन्ही गोष्टींबाबत चांगली मांडणी झाली. परिषदेकडून AIIB ला स्पष्ट संकेत दिला गेला की तिला आणि तिच्या सध्याच्या ध्येय धोरणाला इथे कदापि स्वीकारले जाणार नाही. पण त्याच बरोबर कोणत्या प्रकारची धोरणे आणि प्रकल्प जनतेच्या हिताचे आणि पर्यावरणीय हानी न पोहचवणारे असतील, याबाबत ठोस मांडणीही करण्यात आली.

याच संदर्भात अनेक वर्षांच्या संघर्षातून २००३ साली Equator Principle मांडले गेले. ज्याचा अर्थ आर्थिक संस्थांनी प्रकल्पांबाबत पर्यावरणीय आणि सामाजिक धोक्याची शक्यता समजून, त्याचे मूल्यांकन करून, त्याचे व्यवस्थापन करावे. यासाठीचे किमान मानक या equator principles ने निश्चित केले आहे जेणेकरून जबाबदारपणे धोक्याचे व्यवस्थापन

*(पान ९ वर)*

***संपादकीय,*** *(पान ४ वर)*

होऊ शकेल. जगातील ३७ देशांमधल्या ९२ आर्थिक वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांनी ही Equator Principles स्वीकारली आहेत आणि बऱ्याच उदयोन्मुख आणि विकसनशील बाजारातील प्रकल्पांना ती लागू केली आहेत. तरीही कच्छमधील मुंद्रा गावात असलेल्या टाटा मुंद्रा पॉवर प्रकल्प बाधित बुधा इस्माईल जाम या मच्छिमाराला याचा काहीही उपयोग झाला नाही. या कंपनी विरुद्ध अमेरिकेतील कोर्टात दाखल केलेल्या केसमध्ये तो मुख्य पक्षकार आहे. या वर्षी मे महिन्यात अमेरिकेच्या सर्वोच्च कोर्टाने आंतरराष्ट्रीय वित्तीय कॉर्पोरेशन (International Finance Corporation - IFC) विरुद्ध मुंद्रा गावकऱ्यांची केस दाखल करून घेतली आणि आता लवकरच निर्णय होईल की IFC ला आंतरराष्ट्रीय कायद्याने दिलेले संरक्षण योग्य आहे का! ही जगातील अशी पहिलीच अभूतपूर्व घटना आहे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की IFC ची सामाजिक आणि पर्यावरणीय परिणामांचे मूल्यमापन करण्याची स्वत:ची यंत्रणा आहे, तसेच टाटा पॉवर कंपनीकडूनही पर्यावरणतज्ज्ञ पर्यावरणाला हानी न पोहचण्याची काळजी घेतात. तरीही स्थानिकांवर अन्याय होतोच आहे. याचे मुख्य कारण असे आहे की मोठे मोठे पायाभूत प्रकल्प ठरवताना प्रत्यक्ष स्थानिक परिस्थितीला विशेषत: स्थानिक जनतेला दुय्यम स्थान दिले जाते. आणखी महत्वाचे म्हणजे 'विकास म्हणजे मोठे प्रकल्प नव्हेत तर स्थानिक अर्थव्यवस्थेला मजबूत करणारे उद्योग आणि प्रकल्प' असं म्हणणारा क्षीण आवाज या आर्थिक संस्थांना ऐकण्याची इच्छा नसते. समाजातील खालच्या थरामधील लोकांना सक्षम करणे हे त्यांचे उद्दिष्ट कधीच नसते. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये तळाशी असणाऱ्यांना न्याय मिळण्याची शक्यता दिसत नसल्याने परिषदेमध्ये सामाजिक थर निर्माण होण्याची प्रक्रियाच नष्ट करावी अशी मागणी केली गेली.

या संदर्भात आर्थिक वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांवर दोन पातळींवर दबाव आणणे गरजेचे आहे. एक म्हणजे त्यांनी दिलेले कर्ज कशा प्रकारे वापरले जाणार आहे याचे मापदंड ठरवणे. दुसरे आणि जास्त महत्वाचे म्हणजे कोणत्या प्रकल्पांना, का कर्ज देणार याची कारणे विचारण्याचा हक्क जन आंदोलनांना मिळणे. उदाहरणार्थ, पुढच्या दहा वर्षात किती विजेची आणि रस्त्यांची गरज उत्पन्न होणार याची आजची आकडेवारी पुढे प्रत्यक्षात वेगळी असू शकते. अमेरिकन आणि युरोपियन विकासाचे प्रारूप जरी शाश्वत नसले तरी आजच्या घडीला त्याचाच आधार घेऊन पायाभूत सुविधांचे प्रकल्प योजले जातात. मुंबईतील जन परिषदेत या दोन्ही मुद्द्यांवर काम केले गेले आणि पुढेही अनेक कामांच्या योजना आखल्या गेल्या. आत्ताची विकासाची व्याख्या बाजूला सारून नवीन दृष्टिकोनाने त्यावर विचार केला नाही आणि तळागाळातील लोकांचा आवाज प्रामाणिकपणे ऐकला नाही तर उद्योग आणि सामान्य जनता यांच्यामधील संघर्ष अटळ आहे!

*रजनी बक्षी*
*rajnibakshi@yahoo.com*

*(संपादकीय व खास वृत्त या सदरांसाठी अनुवाद सहाय्य*
*- माधुरी वारियाथ, मीनल उत्तुरकर )*